**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी महायुतीचं रिपोर्टकार्ड प्रसिद्ध

- राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्व जिल्ह्यात निवडणूकपूर्व तयारीला सुरुवात

- मुंबईतल्या ओशिवरा भागात इमारतीत लागलेल्या आगीत ३ जणांचा मृत्यू

- मुंबई विमानतळावर प्रवाशाकडून ३ कोटी ४६ लाख रुपयांचा गांजा जप्त

**<u>आणि</u>**

- भारत विरुद्ध न्यूझीलँडच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्याचा आजच्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द

**<><><><><>**

महाराष्ट्रात काल विधानसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आता सर्वच पक्षांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीनं आज सरकारच्या आजपर्यंतच्या कामांचा आढावा घेणारं प्रगती पुस्तक प्रकाशित केलं.

महाविकास आघाडीने अडीच वर्षांत अनेक प्रकल्पांमध्ये अडथळे आणले. पण, महायुतीचं सरकार आल्यानंतर विकासाला गती मिळाली, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मुंबईत केलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या

उपस्थितीत आज महायुतीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले, खासदार सुनील तटकरे हे देखील उपस्थित होते. महायुती सरकारच्या कामाचा आढावा घेणारं काम हीच आमची ओळख हे रिपोर्ट कार्ड या पत्रकार परिषदेत प्रकाशित करण्यात आलं.

महाविकास आघाडीचं स्थगितीचं सरकार २०२२ मध्ये जाऊन त्यानंतर महायुतीचं गती आणि प्रगतीचं सरकार आलं. महाराष्ट्रात परिवर्तन करणाऱ्या योजना महायुती सरकारनं केल्या. शेती, शिक्षण, नदीजोड तसंच सिंचन प्रकल्प, विविध प्रशासकीय घटकांसाठी दिलासा अशा योजना महायुती सरकारने आणल्या, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विरोधक सातत्यानं फेक नॅरेटिव्ह पसरवत होते. मात्र, एकाच टप्प्यात निवडणुका जाहीर झाल्या आहेत. २०२२ ते २०२४ या काळात आपल्याबद्दल विरोधकांनी आरोप केले. पण, महायुती सरकारनं फार विचारपूर्वक योजना जाहीर केल्या. सर्व घटकांना या योजनांच्या माध्यमातून लाभ देण्याचा प्रयत्न सरकारने केला. त्याचा लेखाजोखा रिपोर्ट कार्डात आहे असं उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीसाठीचा कार्यक्रम केंद्रीय निवडणूक आयोगाने काल जाहीर केला. त्यानुसार राज्यातल्या सर्व जिल्ह्यात निवडणूकपूर्व तयारीला सुरुवात झाली आहे.

**वाशिम** जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी काल वार्ताहर परिषदेत निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. यावेळी निवडणुकीच्या तयारीविषयी माहिती देण्यात आली. आचारसंहिता सुरू झाल्यामुळे सर्व राजकीय पक्षांनी जाहिरात फलक हटवावेत तसंच नियमांचं काटोकोर पालन करावं असे आदेश निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले.

**अकोला** जिल्ह्यात निवडणूक मुक्त वातावरणात व्हावी यासाठी चोख बंदोबस्त ठेवण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले आहेत. यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी तपासणी पथकं, चेकपोस्ट ठेवण्यात येणार आहेत. मतदान केंद्रावर मतदारांसाठी आवश्यक सर्व सोयीसुविधा उपलब्ध करायलाही जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितलं आहे.

**नंदुरबार** जिल्ह्यात आदर्श आचारसंहितेचं काटेकोर पालन करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी दिले आहेत. कुठलाही अनुचित प्रकार आढळून आल्यास योग्य कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा अधिकाऱ्यांनी दिला.

**नाशिक** जिल्ह्यात तसंच निवडणुकीसाठी करण्यात आलेल्या तयारीची माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी वार्ताहर परिषदेत दिली. तसंच राजकीय पक्षांना फलक हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**सिंधुदुर्ग** जिल्हा प्रशासनानं विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. जिल्ह्यातल्या तीन विधानसभा मतदारसंघात ९२१ मतदान केंद्र उभारण्यात येणार आहेत. तसंच निवडणुकीच्या काळात गैरप्रकार

टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय करणार असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुका झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या प्रत्येक बैठकीत या सरकारने आपण काहीतरी जनतेसाठी देत आहोत, असे दाखवण्याचा प्रयत्न केला, मात्र खरा फायदा अदानी समूहाला करून दिला, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे. धारावीमध्ये ५४० एकर, कुर्ला येथे २१ एकर, मुलुंड, भांडूप आणि कांजुरमार्ग असा एकत्रित २५५ एकर, मढमध्ये १४० एकर, देवनारमध्ये १४० एकरचा भूखंड अदानी समूहाला मिळाला आहे, त्याचा शासन आदेश निघेपर्यंत निवडणुका जाहीर झाल्या नाहीत, असं ते म्हणाले. मविआ सत्तेत आल्यावर अदानी समूहाला दिलेले भूखंड काढून घेऊ, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेणारा ‘रणांगण विधानसभेचे’ हा कार्यक्रम उद्या  गुरुवार, १७ ऑक्टोबरपासून आकाशवाणीवर सुरू होत आहे. दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागांच्या Youtube वरुन हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**<><><><><>**

मुंबईच्या ओशिवरा भागात आज एका इमारतीतल्या घराला लागलेल्या आगीत तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका वृद्ध दांपत्याचा आणि त्यांच्या मदतनीसाचा समावेश आहे. ओशिवरा इथल्या रिया पॅलेस या इमारतीत दहाव्या मजल्यावर सकाळी साडे आठच्या सुमाराला आग लागली. आगीच्या धुरामुळे गुदमरून चंद्रप्रकाश सोनी, ममता सोनी आणि त्यांचा मदतनीस पेलू बेटा यांचा मृत्यू झाला. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणली असून या आगीचं कारण अद्याप अस्पष्ट आहे.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यात तुमसरच्या खापा टोली परिसरात वाळूच्या टिप्परनं दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर टिप्पर चालक फरार झाला आहे. या प्रकरणी तुमसर पोलीस तपास करत आहेत.

**<><><><><>**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाकडून गांजा पकडला. हा गांजा साधारण ३ कोटी ४६ लाख रुपये किंमतीचा आहे. हा गांजा खाद्यपदार्थांच्या पाकिटात भरुन प्रवाशाने ती पाकीटं आपल्या जवळच्या ट्रॉलीत ठेवली होती. दुबईहून आलेल्या एका प्रवाशाने कर चुकवून आणलेलं सोनंही सीमाशुल्क विभागानं जप्त केलं. हे २४ कॅरेट सोनं सळ्यांच्या स्वरुपात एका शिवणयंत्रात लपवून आणलं होतं.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथली तुळजाभवानी देवी दसऱ्याच्या सीमोल्लंघनानंतरची श्रमनिद्रा पूर्ण करून अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागरी पौर्णिमेला पुन्हा सिंहासनारूढ होते. यानिमित्त लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी पायी येत असतात. त्यामुळे आज आणि उद्या तुळजापूर मार्गावरील वाहतुक वळवण्यात आली आहे. सर्व मार्गांवर वाहतुकीसंदर्भात दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत, भाविकांनी रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावं, आणि हा उत्सव सुरक्षित पार पाडावा, असं आवाहन धाराशिवचे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी केलं आहे.

**<><><><><>**

दहशतवाद, फुटीरतावाद आणि उग्रवाद ही जगासमोरची मुख्य्ं आव्हानं असून, कट्टरता आणि दहशतवादाच्या मार्गानं कोणताही देश प्रगती करू शकत नाही, असा स्पष्ट इशारा परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पाकिस्तानच्या भूमीवरून दिला आहे. ते आज इस्लामाबाद इथं तेवीसाव्या शांघाय सहकार्य संघटना अर्थात एससीओच्या परिषदेला संबोधित करत होते. सीमेपलिकडून दहशतवाद होत असताना व्यापाराला प्रोत्साहन देता येत नाही, असंही परराष्ट्रमंत्र्यांनी बजावलं. भारतीय परराष्ट्र मंत्र्यांनी पाकिस्तानला भेट देण्याची ही गेल्या नऊ वर्षातली पहिलीच वेळ आहे. दरम्यान, जयशंकर यांनी आज सकाळी, एक पेड मां के नाम या उपक्रमाचा एक भाग म्हणून इस्लामाबादच्या भारतीय उच्चायुक्त कार्यालयात अर्जुन वृक्षाचं रोप लावलं.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीर या केंद्रशासित प्रदेशाचे पहिले मुख्यमंत्री म्हणून नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी आज शपथ घेतली. श्रीनगरच्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झालेल्या कार्यक्रमात नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. अब्दुल्ला यांच्याबरोबर आणखी ५ मंत्र्यांचाही शपथविधी यावेळी झाला. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव तसंच इंडीया आघाडीतले इतर नेते या समारंभाला उपस्थित होते. दहा वर्षांनंतर इथं झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स पक्षानं बहुमत मिळवलं आहे. हरयाणात भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी नायबसिंग सैनी यांची निवड झाली असून सलग दुसऱ्या कार्यकाळासाठी मुख्यमंत्री म्हणून ते उद्या शपथ घेतील.

**<><><><><>**

खेळणी तयार करण्यासाठी सर्व प्रकारचे घटक उपलब्ध करून देणारी परिसंस्था भारताने तयार केली असून भारत हा आता खेळणी निर्यात करणारा देश बनल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी सांगितलं. नवी दिल्ली इथं पहिल्या इंडियन फाऊंडेशन क्वालिटी मॅनेजमेंट परिषदेच्या समारोपाच्या कार्यक्रमात ‘विकसित भारत २०४७ साठी राष्ट्रीय गुणवत्ता चळवळीचं शासन’ या विषयावर गोयल बोलत होते. देशात एक मजबूत गुणवत्तापूर्ण परिसंस्था तयार करण्यासाठी सरकार झिरो डिफेक्ट, झिरो इफेक्ट या सूत्रानुसार काम करत आहे, असं गोयल यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंडमध्ये सुरू झालेल्या कसोटी क्रिकेट मालिकेच्या पहिल्या सामन्यातला पहिल्या दिवसाचा खेळ पावसामुळे रद्द झाला आहे. सकाळी बेंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदान परिसरात पाऊस असल्याने सामना सुरू व्हायला उशिर झाला होता. दुपारी चहाच्या विश्रांतीपर्यंत पाऊस कायम राहिल्याने आजच्या दिवसाचा खेळ रद्द झाल्याची घोषणा करण्यात आली.

-<><><><><>

रबी हंगामातल्या पिकांसाठी किमान हमीभावात वाढ करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळानं घेतला आहे. मंत्रीमंडळ बैठकीनंतर माहिती आणि प्रसारणमंत्री आश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. गव्हाच्या हमीभावात प्रतिक्विंटल दीडशे रुपये वाढ झाली आहे.

//<><><><><>//